# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः07.02.2025** **वारःशुक्रवार**

1. रालोआ सरकारचं काम सबका साथ, सबका विकास या तत्त्वानुसार सुरू असल्याचं पंतप्रधानांचं राज्यसभेत प्रतिपादन
2. उद्योगांना त्रास देणाऱ्यांविरोधात मकोका अंतर्गत कारवाई करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश
3. ज्येष्ठ क्रिकेट समीक्षक, लेखक द्वारकानाथ संझगिरी यांचं मुंबईत प्रदीर्घ आजारानं निधन आणि
4. नागपूरमध्ये झालेल्या मर्यादित षटकांच्या पहिल्या क्रिकेट सामन्यात भारताचा इंग्लंडवर चार गडी राखून विजय

**संसद**

सबका साथ, सबका विकास या तत्त्वानुसारच राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं कामकाज सुरू असून 'राष्ट्र प्रथम' हे आपल्या सरकारच्या विकासाचं मॉडेल असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला उत्तर देताना ते काल बोलत होते. या विकासाच्या मॉडेलला देशातल्या जनतेनं समर्थन दिल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. राष्ट्रपतींचं अभिभाषण भविष्यासाठी मार्गदर्शक असल्याचं पंतप्रधान म्हणाले. केंद्र सरकारने कौशल्य विकास, आर्थिक समावेशन आणि औद्योगिकीकरणावर लक्ष केंद्रित केल्याचं सांगून पंतप्रधानांनी  मुद्रा योजना, गरीबांना आरक्षण, शिक्षण, रोजगार अशा अनेक मुद्यांवर भाष्य केलं. यानंतर राज्यसभेत धन्यवाद प्रस्ताव संमत करुन कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

त्यापूर्वी काल संसदेच्या दोन्ही सभागृहात कामकाज सुरू झाल्यावर अमेरिकेतून भारतीय नागरिकांना हद्दपार केल्याच्या मुद्यावरून विरोधी पक्षांच्या सदस्यांनी गदारोळ केला. त्यामुळे लोकसभेचं कामकाज तीनदा तहकूब झालं. त्यानंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**जयशंकर**

बेकायदेशीररित्या राहणाऱ्या नागरिकांना संबंधित देशात परत पाठवण्याची प्रक्रिया नवीन नसून ही सामान्य प्रक्रिया आहे. आपले नागरिक इतर देशात बेकायदेशीररित्या राहत असतील तर त्यांना परत आणणं हे आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये सामान्यपणे स्वीकारलं गेलेलं तत्त्व आहे, असं परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. अमेरिकेने भारतीय नागरिकांना हद्दपार केल्याच्या मुद्द्याबाबत संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये त्यांनी काल निवेदन दिलं.

**परीक्षापेचर्चा**

'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या सोमवारी 10 फेब्रुवारीला विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्याशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा आठवा भाग आहे. परीक्षेच्या ताणाचं

व्यवस्थापन विद्यार्थ्यांना करता यावं या दृष्टीनं पंतप्रधान या कार्यक्रमातून मार्गदर्शन करतात. नवी दिल्लीच्या भारत मंडपम-मध्ये होणाऱ्या या कार्यक्रमात विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातले मिळून 36 विद्यार्थी प्रत्यक्ष सहभागी होणार आहेत.

**<u>मुख्यमंत्री</u>**

उद्योगांना त्रास होईल अशी वर्तवणूक करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई केली जाईल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिला. पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील विविध विकासकामांचं लोकार्पण आणि भूमिपूजन फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं; त्यावेळी ते बोलत होते. पिंपरी चिंचवडच्या नवीन पोलीस आयुक्तालयाचं, तसंच पुणे पोलिस अधीक्षक कार्यालयाचं भूमीपूजनही यावेळी करण्यात आलं. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले......

**या पुण्याच्या भागात मधून मधून आम्हाला इंडस्ट्री कडून तक्रार येते की आम्हाला त्रास दिला जातोय आम्हाला ब्लॅकमेल केलं जातंय, वसुली केली जातेय हे काहीही झालं तरी खपवून घ्यायचं नाही आणि मी तुम्हाला आज ऑथराईज्ड करतोय कारण यातले काही वेगवेगळ्या पक्षाचे लोक असतील आमचे असतील दादांचे असतील शिंदे साहेबांचे असतील पण कुठल्याही पक्षाचे लोक असतील तरी या बाबतीत कुठलही कॉम्प्रमाइज करायचे नाही जर इंडस्ट्री ला कोणी त्रास देत असेल तर त्यावर मोक्का सारखीच कारवाई करायची त्या खालची कारवाई करायचीच नाही काहीही झाल तरी उद्योगाला त्रास होऊ नये.**

उपमुख्यमंत्री अजित पवार या कार्यक्रमाला उपस्थित होते. आपल्या भाषणात पवार यांनी आयुक्तालयाच्या आराखड्याची माहिती दिली, तसंच पुरंदरमध्ये नवीन विमानतळ प्रस्तावित असल्याचंही नमूद केलं.

**<u>मुख्यमंत्री</u>**

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते चाकण इथं निबे डिफेन्स ॲण्ड एरोस्पेस लिमिटेडच्या अत्याधुनिक क्षेपणास्त्र संकुल आणि लघु शस्त्रास्त्र उत्पादन सुविधेचं उद्घाटनही काल झालं. काळाची पावलं ओळखून महाराष्ट्रानं 2017 मध्ये संरक्षण उत्पादन धोरण तयार केलं असून आज महाराष्ट्र; आणि त्यातही पुणे हे देशातलं संरक्षण उत्पादनाचं केंद्र ठरत आहे, असं प्रतिपादन फडणवीस यांनी यावेळी केलं. मुख्यमंत्र्यांनी काल मोशी इथं सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचं तसंच तळेगाव इथल्या हॅवमोर लोट्टे आईस्क्रीम उत्पादन प्रकल्पाचंही उद्घाटन केलं.

**<u>पुणे-जीबीएस</u>**

पुण्यात जीबीएसच्या संशयित रुग्णांची संख्या 173 झाली असून, 140 जणांना या आजाराचं निदान झालं आहे. या आजारमुळे आतापर्यंत 6 जणांचा मृत्यू झाला आहे. जीबीएसच्या 72 रुग्णांना उपचारानंतर रुग्णालयातून घरी सोडण्यात आलं असून 21 जण जीवरक्षक प्रणालीवर आहेत.

दरम्यान, दूषित पण्यामुळेच जीबीएस आजार होत असल्याचा अहवाल एनआयव्हीने दिला आहे. जीबीएसच्या वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन, एनआयव्ही आणि राज्य सरकारच्या आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांची महापालिकेत संयुक्त बैठक झाली. या बैठकीत एनआयव्हीच्या अधिकाऱ्यांनी पाहणी अहवाल सादर केल्याचं महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त बी. पी. पृथ्वीराज यांनी सांगितलं.

**सेठी नियुक्ती**

राज्य परिवहन महामंडळाच्या अध्यक्षपदी परिवहन सचिव संजय सेठी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी या पदावर लोकप्रतिनिधींची नियुक्ती होत होती, मात्र प्रथमच ही जबाबदारी एका सनदी अधिकाऱ्यावर सोपवण्यात आली आहे.

**एकनाथ शिंदे-नांदेड**

मराठवाड्याची दुष्काळवाडा ही ओळख दूर करणार असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. नांदेड इथं जाहीर सभेत ते काल बोलत होते. लोकहिताच्या योजना बंद होणार नाहीत, असं त्यांनी नमूद केलं. गेल्या अडीच वर्षात युती सरकारने केलेल्या विविध कामांची त्यांनी यावेळी माहिती दिली.

**तटकरे**

अंगणवाडी भरती प्रक्रियेत कोणत्याही आमिषाला बळी पडू नका, असं आवाहन महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केलं आहे. एकात्मिक बाल विकास सेवा पर्यवेक्षकीय अधिकारी, संरक्षण अधिकारी, अधीक्षक ही पदे भरण्यात येत आहे. भरती प्रक्रिया अतिशय पारदर्शक पद्धतीने होणार असल्याचं तटकरे यांनी काल सांगितलं.

**कृष्णामाई महोत्सव-सांगली**

सांगलीत आजपासून 'कृष्णामाई महोत्सवाचं' आयोजन करण्यात आलं आहे. सहा दिवस चालणाऱ्या या महोत्सवात ध्वजारोहण, शोभायात्रा, कृष्णामाई आरती, प्रवचन, भजन, कीर्तन, पथनाट्य, दीपोत्सव, चला जाणूया नदीला, जलपूजन, असे विविध कार्यक्रम होणार आहेत. यानिमित्त आयर्विन पुलावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून कृष्णा नदी परिसराची स्वच्छता करण्यात आली आहे.

**बुद्धअस्थी-नागपूर**

रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त काल नागपुरातील दीक्षाभूमीवर थायलंड वरून आलेल्या भगवान गौतम बुध्दांच्या अस्थींचं आगमन झालं. त्यांचं दर्शन घेण्यासाठी शेकडो बौध्द अनुयायांनी दीक्षाभूमीवर गर्दी केली होती. महाबोधी चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष भदंत हर्षबोधी यांचा नेतृत्वात तथागत बुद्धांच्या अस्थी दीक्षाभूमीवर आणण्यात आल्या असून आज या अस्थी अमरावतीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ठेवल्या जाणार आहे.

**वैदिक संमेलन-रत्नागिरी**

रत्नागिरीत आजपासून क्षेत्रीय वैदिक संमेलन आयोजित करण्यात आलं असून, त्यात चारही वेदांचं पठण केलं जाणार आहे. कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या रत्नागिरीतल्या भारतरत्न डॉ. पांडुरंग काणे संस्कृत अध्ययन उपकेंद्रानं हे संमेलन आयोजित केलं आहे.

**तमाशा महोत्सव-सातारा**

लोकसंस्कृतीचं जतन संवर्धन व्हावं तसंच नवीन पिढीला आपल्या संस्कृती आणि परंपरेची ओळख व्हावी, या उद्देशानं आजपासून 11 तारखेपर्यंत सातारा इथल्या श्री शाहू कलामंदिरामध्ये तमाशा महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे.

**समुपदेशन**

दहावी आणि बारावीच्या परीक्षा येत्या 11 फेब्रुवारीपासून सुरु होत आहेत. परीक्षा काळात विद्यार्थ्यांचं समुपदेशन करण्यासाठी राज्य मंडळस्तरावर समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती राज्य मंडळ सचिव डॉक्टर माधुरी सावरकर यांनी दिली. सकाळी 8 ते रात्री 8 या कालावधीत विद्यार्थ्यांना भ्रमणध्वनीद्वारे निःशुल्क समुपदेशन मिळणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**क्रिकेट**

इंग्लंडविरुद्धचा मर्यादित षटकांचा पहिला क्रिकेट सामना काल भारतानं चार गडी आणि 68 चेंडू राखून जिंकला. नागपूरच्या विदर्भ क्रिकेट संघटनेच्या मैदानावर झालेल्या या सामन्यात इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला, आणि 48 व्या षटकातच सर्व गडी गमावून 248 धावा केल्या. भारतातर्फे हर्षित राणा आणि रविंद्र जडेजा यांनी प्रत्येकी 3 गडी बाद केले. रविंद्र जडेजानं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधे 600 बळींचा टप्पा गाठला. 249 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात अडखळत झाली. मात्र नंतर श्रेयस अय्यर, अक्षर पटेल आणि शुभमन गिल यांनी संयमी खेळी करत भारताचा विजय साकार केला. या विजायमुळे तीन सामन्यांच्या या मालिकेत भारताला 1-0 अशी आघाडी मिळाली आहे.

**संझगिरी निधन-मुंबई**

ज्येष्ठ क्रिकेट समीक्षक आणि लेखक द्वारकानाथ संझगिरी यांचं काल मुंबईत प्रदीर्घ आजारानं निधन झालं. ते 74 वर्षांचे होते. गेले काही दिवस त्यांच्यावर लीलावती रुग्णालयात उपचार चालू होते. त्यांच्या पार्थिवावर आज मुंबईच्या शिवाजीपार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

मुळात स्थापत्य अभियंता असलेले संझगिरी मुंबई महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा प्रकल्पाचे मुख्य अभियंता म्हणून निवृत्त झाले होते. 1980 पासून त्यांनी विविध वृत्तपत्रातून क्रीडाविषयक लेखन केलं. मराठीतलं पहिलं क्रीडा पाक्षिक 'एकच षट्कार'चे कार्यकारी संपादक म्हणून त्यांनी काम पाहिलं. क्रिकेटविषयीची त्यांची अनेक पुस्तकंही प्रसिद्ध झाली आहेत.

**हवामान**

उद्या सकाळपर्यंत राज्यात सर्वत्र हवामान कोरड राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.